| | |
|---|---|
| | **विशेष दरखास्त क्र.१/२०१६ मधील**<br>**निशाणी क्रमांक १ खालील आदेश**<br>**[MHWS050001562016]** |

१) प्रस्तुतची दरखास्त आजरोजीच्या बोर्डावर नेमलेली आहे.

२) धनको यांचे विधीज्ञ श्री. एम.यु.राठोड यांनी असा युक्तीवाद केला की, धनको मयत धनको परती मोहना धोती यांनी एल.ए.सी. क्रमांक २५/२०१५(जुना एल.ए.सी. क्र. १८/२०१५) मधील दिनांक ०९.०२.२०१६ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार प्रस्तुतची दरखास्त दिनांक २८.६.२०१६ रोजी नुकसान भरपाई रक्कम रुपये ०८,९७,८४४/– वसूल होवून मिळणेसाठी दाखल केलेली होती. त्यानंतर या दरखास्तीमधील निशाणी क्र १ खालील दिनांक २६.०२.२०२६ रोजीच्या आदेशानुसार रक्कम रुपये १,१२,५२१/– ही मिळालेली आहे. धनको यांना ऋणकोकडून कोणतीही रक्कम येणे बाकी नाही. त्यामुळे प्रस्तुतची दरखास्त धनको यांना चालविणे नाही व धनको ही दरखास्त काढून घेत आहे. तरी प्रस्तुतची दरखास्त निकाली काढण्यात यावी याबाबत स्वतंत्र पुरसीस निशाणी क्र. १३ दाखल केलेली आहे.

३) सहायक अधिक्षक यांच्या दिनांक २७.०४.२०२६ रोजीच्या अहवालानुसार व्याजासहीत एकुण रक्कम रु १,१३,३१३/– ही दिनांक १३.०३.२०२६ रोजी डी.डी.द्वारे अर्जदारास प्रदान करण्यात आली आहे. प्रस्तुतची दरखास्त ही ९ वर्ष १० महिना ०५ दिवस इतकी जुनी आहे. उपरोक्त सर्व परिस्थिती, धनको यांच्या विधीज्ञांचा उपरोक्त युक्तीवाद आणि धनको यांचे विधीज्ञांनी दिलेली पुरसीस निशाणी क्र.१३ विचारात घेवून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## **आदेश**

प्रस्तुतची दरखास्त ही पुर्णफेड झाली असल्याने पुरसीस निशाणी क्र. १३ नुसार निकाली काढण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2026.05.04 13:40:10 +0530

स्थळ : मंगरुळपीर
दिनांक : ०४.०५.२०२६

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | C.R.Gadge |
| Name of Court | : | Shri. D. B. Hambire,<br>C.J.S.D.,Mangrulpir |
| Date of Decision | : | 4.5.2026 |
| Order signed by the P.O. on | : | 4.5.2026 |
| Order Uploaded on | : | 4.5.2026 |